P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ०८/०७/२०२३

## दि.०७/०७/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ७०१/२०२३ भा.द.वि.कलम ३०७,५०४, ५०६,३४ आर्म ॲक्ट कलम४ (२७), महा.पो.अधि.कलम ३७ (१) (३)सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०७/०७/२०२३ रोजी रात्रौ ०२/०० वा चे सुमारास विठ्ठलनगर बि. नं. ७, चे पार्किंग मध्ये, पिंपरी , पुणे |
| गुन्हा दाखल | :- | ०७/०७/२०२३ रोजी १८.२८ वा |
| फिर्यादी | :- | शुभम राम माने वय २५ वर्षे राहणार विठ्ठलनगर बिल्डिंग नं. ७, निवारा हौसिंग सोसायटी, फ्लॅट नं. ६०३, पिंपरी,पुणे |
| आरोपी | :- | १)चिराग गायकवाड वय अदांजे २० वर्षे राहणार विठ्ठलनगर बिल्डिंग नंबर ११, नेहरुनगर पिंपरी पुणे<br>२)शुभम साबळे वय अदांजे २० वर्षे राहणार विठ्ठलनगर बिल्डिंग नंबर ९, नेहरुनगर पिंपरी पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी आरोपीतांना बोलण्याकरीता फोन दिला असता तो परत मागीतला असता याकारणावरुन आरोपी क्र १) व २) यांनी लोखंडी कोयत्याने फिर्यादीच्या डोक्यात व हातावर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने वार केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि कैलासे ७७२०९२३९७७ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ७०३/२०२३ भा.दं.वि.कलम ३२६,४२७,५०४,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०६/०७/२०२३ रोजी २०/३० वा. चे दरम्यान संगम मोबाईल शॉपी, महेशनगर चौपाटी, पिंपरी,पुणे |
| गुन्हा दाखल | :- | ०७/०७/२०२३ रोजी २२.२० वा |
| फिर्यादी | :- | विजय जनार्दन खेडेकर, वय-३६ वर्षे, धंदा- ड्रायव्हर, रा. दोस्ती बेकरी समोर, विठ्ठलनगर झोपडपट्टी, पिंपरी,पुणे. |
| आरोपी | :- | १)अनिकेत वाघमारे, वय अंदाजे-२५ वर्षे, रा. झिरो बॉईज चौक, अजमेरा रोड, पिंपरी,पुणे<br>२) हितेश पार्चा उर्फ वाल्मीकी,वय-२० वर्षे, रा. विठ्ठलनगर, पिंपरी,पुणे<br>३) यश पुर्ण नांव माहीत नाही. वय- अंदाजे -१९ वर्षे, रा. वाळकेचाळ, विठ्ठलनगर झोपडपट्टी,पिंपरी,पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी क्र ३ पुर्ण नांव माहीत नाही. याच्यासोबत दुपारी झालेल्या वादाच्या कारणावरुन नमुद अरोपी यांनी मिळुन फिर्यादी यांची रिक्षाची काच फोडुन वाईट वाईट शिवीगाळ करुन हाताने माराहण करुन फिर्यादी यांच्या डोक्यात लाकडी दांडके मारुन गंभीर जखमी केले आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि चाटे ९९६०९२४८५६ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ३८१/२०२३भा.दं.वि कलम ३८१,४५७, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०१/०६/२०२३ रोजी १९.०० वा. ते दि.०५/०७/२०२३ रोजी ०८.३० वा. चे दरम्यान ओ.ई.एन. इंडीया लिमीटेड कंपनी आंबेठाण रोड खराबवाडी ता. खेड जिल्हा पुणे येथील कंपनीचे स्टोअर रुममधून |
| गुन्हा दाखल | :- | ०७/०७/२०२३ रोजी २१.२१ वा |
| फिर्यादी | :- | हरी राहु वय ४९ वर्षे धंदा नोकरी रा.सर्वे नंबर २५९ जानवी निवास कलवड वस्ती लोहगाव पुणे |
| आरोपी | :- | १.राहुल ओमप्रकाश तिवारी वय २५ रा.अर्थव हॉटेलचे पाठीमागे वजन काटयाजवळ ता. खेड जिल्हा पुणे,<br>२.संजय रामखिलावन सिंग ४८ रा. जंबुकरवस्ती अवधुत शिंदे यांचे घरी भाडयाने ता. खेड जिल्हा पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी येथील कंपनीचे स्टोअर रुममधून कंपनी मध्ये बॉम्बे इंटीलिजिन्स सर्व्हिसेस सिक्युरिटी इंडीया लिमीटेड संगम प्रॉजेट डॉक्टर आंबेडकर रोड पुंणे -१२ या सिक्युरिटीचे काम करणारे सिक्युरिटी गार्ड आरोपी क्र १ व २ यांनी फिर्यादीचे कंपनीचे एकुण ४८,७३४/- रु किंमतीचे कॉपर वायडींगचे मटेरिअल फिर्यादीचे संमती शिवाय लबाडीचे इरादयाने चोरी करुन नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना १५११ गायकवाड ९८८११३१३०३ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी २९१/२०२३ भादवि कलम ४१९,४२०,३४ माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क)(ड) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०९/०६/२०२३ रोजी ११/३० वा ते दि.०६/०७/२०२३ रोजी दुपारी १२/३० वाचे एम.आय.डी.सी. भोसरी,पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | ०७/०७/२०२३ रोजी १९/०५वा. |
| फिर्यादी | :- | विवेक दत्तु राठोडे वय ३५ धंदा व्यावसाय राहाणार पदमावती अर्पामेंन्ट इंद्रायणी नगर भोसरी पुणे |
| आरोपी | :- | १)दिपक शर्मा<br>२)निपुन मित्तल<br>३)प्रकाश सिंग (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही)<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी फिर्यादी यांना डॉमीनोज फ्रेंचायजी देतो असे म्हणुन त्याचेकडुन वेळोवेळी त्याचे बॅक खाते नंबर ०९९३१००१००००३८५९ वरती पैसे पाठविण्यास सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांची १,००,५१,०००/- रुपयाची फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | वपोनि राजेद्र निकाळजे सा़ो ८८८८९८३३३७ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ७७६/२०२३ भा.दं.वि.कलम ४२०,४०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २७/०६/२०२३ सायंकाळी ०६/०२ ते दिनांक ०४/०७/२०२३ पर्यंत राहते घरी उत्सव होम्स ए-१०५ पाटलनगर बावधन ब्रु//ता.मुळशी जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | ०७/०७/२०२३ रोजी २२.१२ वा |
| फिर्यादी | :- | मलींद माधव भागवत, वय-४० वर्षे, धंदा-नोकरी रा. उत्सव होम्स ए-१०५ पाटलनगर बावधन ब्रु//ता.मुळशी जि.पुणे |
| आरोपी | :- | टेलीग्रॅाम चॅनल @Payroll_Jade ´É @ProfteacherDiane16 वरील अनोळखी इसम<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे मोबाईल वर व्हॉटसप ॲप मोबाईल नं. ६३९८११८१५७२४ या मोबा.नंबर वरुन अनोळखी इसमाचा मॅसेज आला´की तुम्हाला प्रत्येक दिवशी मोकळया वेळेत टास्क दिला जाईल व |

तुम्ही प्रत्येक टास्कला १५० रुपये मिळतील  असे म्हणुन त्याने फिर्यादी यांना टेलीग्रॅाम चॅनल @Payroll_Jade@ProfteacherDiane1६ यावरती टास्क देवुन दिलेल्या अकाऊंट नंबर वरती पैसे ट्रान्सफर करायला सांगुन फिर्यादी यांची रक्कम रुपये एकुण १६,२०,५१३/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि यलमार ९४२३२३९९४३

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड ३५७/२०२३ भादवि कलम ४२०,३४ सह माहीती तंत्रज्ञान अधि क.६६(ड)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- १४/०२/२०२३ रोजी ते दि.१६/०६/ २०२३ दरम्यान माझे राहते घरी थॉमस कॉलनी, आर्दशनगर, बालीका आश्रम जवळ,देहुरोड येथे

गुन्हा दाखल :- ०७/०७/२०२३ रोजी २०.०० वा

फिर्यादी :- अमर बाबुराव घोडके,वय .३३ वर्ष व्यवसाय. नोकरी,रा.थॉमस कॉलनी, आदर्शनगर, बालीका आश्रमजवळ, देहुरोड

आरोपी :- महिला आरोपी **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीहे भारत मॅट्रीमोनी या साईडवर लग्नासाठी मुलगी पाहत असताना सदर साईडवर नमुद आरोपी या महिलेने लग्नाचे आमिष दाखवुन आपले भविष्य उज्वल व्हावे यासाठी आपण @Blescoins2 या ट्रेडीगवर पैसे गुंतवणुक करुन त्यामधुन आपण रक्कम तयार  झाल्यावर चांगले लग्न करु या असे सांगीतल्याने नमुद आरोपी हिच्या सांगण्याप्रमाणे @Blescoins2 यावर पैसे गुंतविण्यासाठी मी एच.डी.एफ.सी बॅक मुख्य शाखा,पुणे यांचेकडुन १५ लाख रुपये वैयक्तीक कर्ज व आयडीएफसी बॅक,मुख्य शाखा, पुणे यांच्याकडुन १५ लाख रुपये कर्ज,बजाज फायनान्स,मुख्य शाखा,पुणे यांच्याकडुन २३ लाख रुपये कर्ज,अँक्सीस बॅक,मुख्य शाखा,पुणे यांच्याकडुन १५ लाख रुपये,क्रेडबी मोबाईलन लोन अँप यांच्याकडुन तीन लाख असे सर्व मिळुन ७१ लाख व माझ्याकडील १५ लाख रुपये असे मिळुन एच.डी.एफ.सी बॅक देहुरोड शाखा,पुणे येथील अंकाऊन्ट नं.५०१००१८१५३९२६२ यावरुन  वेळोवेळी ८६,००,०००/-रुपये गुंतविले परंतु फिर्यादीचे पैसे परत मिळण्यासाठी फिर्यादीला आरोपी हिने सांगीतले की पुन्हा दहा लाख रुपये @Blescoins2 यावर भरावे लागतील असे सांगीतले म्हणुन सदर रक्कम मिळवण्यासाठी मी ca.bhaagyashreetthakar यावर पुन्हा ३,९५,०००/- रुपये व the _uncoventiional_ca यावर १,८०,०००/- रुपये गुंतवण्यास सांगुन माझा विर्श्वास संपादन करुन आतापर्यत फिर्यादी कडुन एकुण ९१,७५,०००/- रुपये एवढी रक्कम घेवुन फिर्यादीची फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि सुर्यवंशी सो ९४२२९३९०७७

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ७०२/२०२३ भा.दं.वि कलम ३९२,३२३, ५०४,५०६, ४२७,३४, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ०३/०७/२०२३ रोजी रात्रौ १२/१५ वाजता ते रात्रौ १२/३० वाजताचे सुमारास जायका बिर्याणी दुकान, अजमेरा कॉलनी रोड, मासुळकर कॉलनी पिंपरी पुणे येथे

गुन्हा दाखल :- ०७/०७/२०२३ रोजी २२.०७ वा

फिर्यादी :- रईस मुकीम खान वय-२७ वष, धंदा-व्यवसाय, रा. मुंबई जायका दुकानामध्ये, अजमेरारोड नेहरूनगर पिंपरी पुणे. मुळगांव-गांव-जमुनाबाजार, ता.मल्लिपुर, जि.श्रावस्ती, राज्य-उत्तरप्रदेश

आरोपी :- १)रोहन मानिक जाधव वय अंदाजे १८ वर्ष,
२)अतुल काळुराम शिंदे वय अंदाजे २१ वर्ष,
३)किरण मंगेश बिरादर वय अंदाजे २१ वर्ष,
४)पवन ससाने वय अंदाजे २० वर्ष सर्व रा.गांधीनगर पिंपरी पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी  फिर्यादी हे त्यांचे भाऊ व दुकानातील कामगार यांचेसह दुकानाची साफसफाई करीत असताना, यातील आरोपी क्र १ व २ हे एका दुचाकी मोटार सायकल वरून आले व दुकाना समोरच लघवी करु लागले, असता फिर्यादी त्यांना म्हणाले की, दुकाना समोर लघवी करु नका, तेव्हा ते म्हणाले तु

आम्हाला दम देतो का असे म्हणुन शिवीगाळ करुन, तुला दाखवितो असे म्हणुन ते तेथुन निघुन जावुन आरोपी क्र ३ व ४ यांना घेवुन येवुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन, फिर्यादी यांचे दुकानाचे काचेचे काऊंटरची लाकडी दांडक्याने तोडफोड करुन, आरोपी क्र १ याने दुकानाचे काऊंटर जवळ जावुन काऊंटर मधील २५००/- रूपये रोख रक्कम जबरदस्तीने काढुन घेतली व आरोपी क्र २ याने दुकानाचे बाहेर लावलेली फिर्यादी यांची अॅक्टीव्हा मोपेड गाडी नं.एम.एच.०६/बी.एक्स १४४६ गाडीची व आरोपी क्र ३ याने फिर्यादी यांचे गाडीचे शेजारी लावलेल्या स्प्लेन्डर मोटार सायकलची लाकडी दांडक्याने तोडफोड केली. तसेच आरोपी क्र ४ याने फिर्यादी यांचे दुकानाचे बाजुला असलेल्या जर्मन बेकरीचे बाहेर ठेवलेल्या झाडांचे कुंडयांची लाकडी दांडक्याने तोडफोड करुन नुकसान केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जाधव ८९७५७२३०३०

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- रावेत २४९/२०२३ भादवि कलम ३७६(२)(एन),पॉस्को अधि. २०१२ चे कलम ४,६,८

गु.घ.ता.वेळ व ठि. :- एप्रिल २०२३ निश्चित तारीख वेळ आठवत नाही या महिन्यात किवळे गाव मराठी शाळेच्या पाठीमागे फिर्यादी राहत असलेल्या रुममध्ये

गुन्हा दाखल :- ०७/०७/२०२३ रोजी २३.५४ वा

फिर्यादी :- फिर्यादी महिला

आरोपी :- महेश रामा कांबळे वय २२ वर्षे रा लोहारा तुळजापुर जवळ
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिचे सोबत त्यांचे नांतेवाईक नमुद आरोपी याने एप्रिल २०२३ महिन्यात दोन वेळा फिर्यादीहे घरी नसतांना फिर्यादीचे घरी येउन फिर्यादीची मुलगी साक्षी हिचे इच्छेविरुध्द जबरदस्तीने शरीरसंबध ठेवले या शरीरसंबंधामुळे फिर्यादीची मुलगी ही ०३ महिन्याची गरोदर राहीलेली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि शिकलगार ९८२२७८६६९६

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- आळंदी १६८/२०२३ भा.द.वि.कलम ४४७, १८८

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०५/२०२३ रोजी ०९/०० वा. ते १०/०० वा.चे दरम्यान मरकळ ता.खेड,जि.पुणे गावचे हद्दीत जमिन गट नं.१०४३,१०४४,१०४५ मध्ये

गुन्हा दाखल :- दि.०७/०७/२०२३ रोजी १७/१६वा

फिर्यादी :- राजेश पन्नालाल नहार,वय.५६वर्षे.धंदा--व्यापार,रा.सी.बिल्डींग फ्लॅट नं.०१,सोबा सबेरा अपार्टमेंट बिबवेवाडी पुणे.३७. ९८९००२६७५०

आरोपी :- १)हौसीराम ऊर्फ पप्पू शिवाजी दिघे
२)भरत नवनाथ आल्हाट
दोघे रा. कोयाळी, ता.खेड,जि.पुणे.
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील विभुजा स्टील प्रा.लि.कंपनीचे संचालक व इतर त्रयस्त व्यक्तींना हस्तक्षेप करण्यास मज्जाव करण्याचे मा.जिल्हा न्यायालय पुणे.यांनी दि.०४/०३/२००९ रोजी आदेश पारीत केलेले असताना देखील त्यांच आदेशाचे आरोपी १ व २ यांनी उल्लंघन करून अनाधिकाराने फिर्यादी यांचे जागेत जाऊन वॉचमन नामे निरंजन यास व इतर मजुरांना जागा आमची आहे काम बंद करा अशी दमदाटी करून त्यांना हुसकुन लावले होते व काम बंद पाडले होते.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ गाडेकर ९९२३२९३०४२

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ४०४/२०२३ भा.दं.वि कलम ४०६,४२०, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | जुन २०१८ ते २०/०१/२०२२ पावेतो च्या कालावधीत हॉटेल सिट्रस, थरमॅक्स चौक, चिंचवड, पुणे व डोंबीवली मुंबई याठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | ०७/०७/२०२३ रोजी २३.३० वा |
| फिर्यादी | :- | राजेंद्र आनंदराव पाटील वय ४६ वर्ष, धंदा व्यवसाय, रा. स्वप्नपुर्ती अपार्टमेंट, वाघेरे कॉलनी नं. ३, बी.विंग, फ्लॅट नं. २०४, पिंपरी, पुणे. |
| आरोपी | :- | १)राजेश उमाशंकर सिंग ऊर्फ राजेश कश्यप वय अं. ५२ वर्ष रा. मित्रता को.ऑप हौ.सो. समतानगर, साई मंदिराजवळ, रेमंड कंपणीसमोर, ठाणे (ईस्ट)<br>२)प्रदिप शशिकांत गांगुर्डे वय अं. ४४ वर्ष, रा. पवारनगर, ठाणे (ईस्ट)<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी क्र. १ याने त्याच्या व्होल्ड मल्टीट्रेड प्रा.लि. या गुंतवणुक कंपनी मध्ये गुंतवणुक केल्यास गुंतवणुक रक्कमेच्या १० टक्के रक्कम अशी एकुन ३० महिणे परतावा मिळेल असा विश्वास दर्शवुन आरोपी क्र. २ चे माध्यमातुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी व अन्य साक्षीदार यांनी गुंतवणुक केलेल्या रक्कमेचा ३० महिनेत १० टक्के परतावा न देता तसेच गुंतवणुक केलेली एकुण १७,७२,४७३/- रु मुद्दल रक्कम परत न देता फिर्यादी यांचा विश्वासघात करुन त्यांनी गुंतविलेल्या रक्कमेचा अपहार करुन आरोपी क्र. २ च्या संगणमताने फसवणुक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि धुमाळ ८५३०८६६३३३ |